# संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची जाहिरात

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१८
## रायगड जिल्हा पोलीस दल

**जाहिरात क्रमांक:- १७६/आस्था/पो.भ.-२०१८/रायगड/२०१८, दि.०५.०२.२०१८** **ठिकाण :- पोलीस मुख्यालय-अलिबाग,**

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ (शा.नि. क्र. जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र. ३०२/तुरुंग-१, दि. १५/०१/२०१६ अन्वये), महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरूष)(सेवाप्रवेश) नियम-२०१२ व शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार रायगड जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील रिक्त असलेल्या पदांपैकी शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून ७५ टक्के पदेच भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

१) **पोलीस शिपाई :**

| | **खुला** | **अजा** | **अज** | **विज-अ** | **भज-ब** | **भज-क** | **भज-ड** | **विमाप्र** | **इमाव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | | | | | | | | | | |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १५ | ३ | १ | २ | १ | २ | ० | १ | २ | २७ |
| महिला | १७ | २ | १ | १ | ० | १ | ० | ० | ३ | २५ |
| खेळाडु | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ०४ |
| प्रकल्पग्रस्त | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ०४ |
| भुकंपग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०१ |
| माजी सैनिक | ८ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | २ | १२ |
| अंशकालीन पदवीधर | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ०४ |
| पोलीस पाल्य | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ०२ |
| गृहरक्षक दल | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ०४ |
| **एकूण** | **५५** | **६** | **२** | **४** | **१** | **३** | **०** | **१** | **११** | **८३** |

२) **कारागृह विभागातील कारागृह शिपाई.**

| | खुला | अजा | अज | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कप्पीकृत आरक्षण ⬇ | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | | | | | | | | | | |
| महिला | | | | | | | | | | |
| खेळाडु | | | | | | | | | | |
| प्रकल्पग्रस्त | | | | | | | | | | |
| भुकंपग्रस्त | | | | | | | | | | |
| माजी सैनिक | | | | | | | | | | |
| अंशकालीन पदवीधर | | | | | | | | | | |
| गृहरक्षक दल | | | | | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | | | | |

(कारागृह महानिरीक्षक / उपमहानिरीक्षक यांनी दिलेला रिक्त पदांचा तपशील पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि पोलीस अधीक्षक, पुणे ग्रा./औरंगाबाद ग्रा. / नागपूर ग्रा. यांनी नमूद करावा).

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१८ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत निवड होऊन पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारास पोलीस नियमावली, १९९९- भाग-३ मधील नियम ४० व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व घटक प्रमुखांनी वेळोवेळी विहित केलेली कर्तव्ये पार पाडावी लागतील.

ड) सध्या पोलीस विभागात वाहन चालकाची पदे स्वतंत्र्यरित्या भरली जात नसल्यामुळे पोलीस शिपाईपदी नियुक्ती झाल्यावर संबंधित पोलीस विभागात वाहन चालकाचे कर्तव्य बजावणे बंधनकारक राहिल. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने वाहन चालकाच्या कर्तव्याच्या अनुषंगाने वेळोवेळी काढलेले आदेश बंधनकारक राहतील.

इ) **पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहतील. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.**

ई) **या कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकातील ०२ रिक्त पदे भरतीसाठी उपलब्ध आहेत.**

उ) **कारागृह विभागात बॅन्डस्मन हे पद मंजुर नाही.**